पुढारी

# विद्यापीठ, शिक्षण उपसंचालक कार्यालय ओस

## केवळ पाच टक्के उपस्थिती; अत्यावश्यक कामकाज सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शासनाने कोरोना विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती पाच टक्के केल्याने शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयासह कोल्हापूर बोर्ड, माध्यमिक वेतन पथक अधीक्षक कार्यालय ओस पडले आहे.

कोरोना विषाणूचा वाढता संसर्ग पाहता राज्य सरकारने यापूर्वीच शाळा, महाविद्यालयांना सुट्टी दिली आहे. त्यानंतर कार्यालयातील उपस्थितांचे प्रमाण कमी करण्याचे आदेश काढले आहेत. विद्यापीठातील अधिविभाग, ग्रंथालय यापूर्वीच बंद करण्यात आले आहे. विद्यापीठ मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये सुमारे ५०० अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. सद्यस्थितीत नेहमी वर्दळ असणारी कार्यालयात कर्मचारी नसल्याने शुकशुकाट आहे.



कोल्हापूर : ओस पडलेले विद्यापीठातील कार्यालय. (छाया : पप्पू अत्तार)

शिक्षण उपसंचालक कार्यालयात ६ अधिकारी व ३३ कर्मचारी असून पाच टक्के उपस्थितीमुळे केवळ प्रत्येक शाखेचा एक कर्मचारी कामकाजासाठी ठेवण्यात आला आहे. वेतन व भविष्य निर्वाह निधी माध्यमिक कार्यालयात अधिकारी व कर्मचारी मिळून १७ जण असले तरी कार्यालयात केवळ कामकाजासाठी एकच कर्मचारी होता. कोल्हापूर बोर्डामध्येही ७५ पैकी काही अधिकारी व कर्मचारी अत्यावश्यक सेवेसाठी कार्यरत असल्याचे दिसून आले.

विद्यापीठातील महत्त्वाचा समजला जाणाऱ्या परीक्षा विभागात कामकाजावरही परिणाम झाला आहे. शाखानिहाय एक व्यक्ती परीक्षेसंदर्भातील अत्यावश्यक कामकाजासाठी ठेवला आहे.

# विविध शुल्क पेमेंट गेटद्वारे भरण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन



**कोल्हापूर :** विद्यार्थी व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी शिवाजी विद्यापीठातील विविध शुल्क ऑनलाईन किंवा पेमेंट गेटद्वारे करावे, असे आवाहन वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांनी केले आहे. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून तसा निर्णय घेतला आहे. विद्यार्थी, पालक व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी विविध शुल्क ऑनलाईन, पेमेंट गेट, डी. डी. अथवा विद्यापीठाच्या खात्यावर रक्कम बँकेत जमा करावी. त्याची मूळ काऊंटर स्लीप जतन करून ठेवून कालांतराने त्या मूळ स्लिपच्या आधारे विद्यापीठाची पावती करून घ्यावी, असे आवाहन श्री. पाटील यांनी केले आहे.

पुढारी

# संचारबंदी काळात ध्वनी, हवा प्रदूषणात घट

## शिवाजी विद्यापीठ पर्यावरणशास्त्र विभाग पाहणी अहवालातील निष्कर्ष

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी केंद्र सरकारने रविवारी लागू केलेल्या संचारबंदी काळात शहरातील महत्त्वाच्या गजबजलेल्या ठिकाणच्या ध्वनी, हवा प्रदूषणामध्ये घट झाल्याचे दिसून आले. शिवाजी विद्यापीठ पर्यावरणाशास्त्र विभागाच्या वतीने करण्यात आलेल्या पाहणी निष्कर्ष अहवालातून ही माहिती पुढे आली आहे.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या निर्देशानुसार विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाने रविवारी संचारबंदीवेळी शहरात ध्वनीची २४ व हवेची तीन ठिकाणी तपासणी केली. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानांकनानुसार औद्योगिक क्षेत्र (७५), व्यावसायिक क्षेत्र (६५), रहिवाशी क्षेत्र (५५) व शांतता क्षेत्रात (५०) टक्के ध्वनी पातळी मर्यादा असणे आवश्यक आहे; परंतु संचारबंदीवेळी रहिवाशी क्षेत्र- राजारामपुरी (४६.६१), शिवाजी पेठ (४३.८९), उत्तरेश्वर पेठ (४३.५४), मंगळवार पेठ (४५.५०), ताराबाई पार्क (३९.९१), नागाळा पार्क (३९.६७). व्यावसायिक क्षेत्र- राजारामपुरी (४७.०४), शाहूपुरी (४२.६३), लक्ष्मीपुरी (४५.५९), मिरजकर तिकटी (४५.२५), बिनखांबी मंदिर (४४.८०),

> संचारबंदीच्या काळात शहरातील महत्त्वाच्या गजबजलेल्या ठिकाणी ध्वनी, हवेचे प्रदूषण कमी झाल्याचे पाहणीतून दिसून आले आहे. भविष्यकाळातही अशा प्रकारच्या उपक्रमातून सर्व प्रकारचे प्रदूषण टाळता येणे शक्य आहे.
>
> **- डॉ. पी. डी. राऊत,** विभागप्रमुख, पर्यावरणशास्त्र विभाग

महाव्दार रोड (४४.५९), गुजरी कॉर्नर (४१.१८), पापाची तिकटी (४२.४०), गंगावेश (४३.३६), बिंदू चौक (४२.०३).

शांतता क्षेत्र- सीपीआर (४४.४२), न्यायालय (३९.४७), जिल्हाधिकारी कार्यालय (३६.६१), शिवाजी विद्यापीठ (३६.१४). औद्योगिक क्षेत्र- वाय.पी.पोवार नगर (३५.१०), उद्यमनगर (३५.६१) टक्के आवाजाची पातळी होती. रस्त्यावर वाहने नसणे, माणसे नसणे, सर्व व्यवहार बंद होते अशी आवाज कमी असण्याची कारणे आहेत. घरगुती आवाज, घरगुती उपकरणे, उपकरणे, बोलणे तसेच लहान मुले, रस्त्यावर खेळणारी मुले, रुग्णवाहिका आवाज, पक्षांचा आवाज ही आवाज वाढण्याची कारणे निष्कर्षातून समोर आली आहेत. हवेच्या प्रदूषण मापनामध्ये प्रदूषित घटकांचे प्रमाण घटल्याचे पाहणीतून निदर्शनास आले आहे. संचारबंदी काळात दाभोळकर कॉर्नर, महाव्दार रोड, अंबाबाई मंदिर परिसर व शिवाजी विद्यापीठ परिसरात पाहणी करण्यात आली. यादिवशी सर्व वाहतूक पूर्ण बंद होती. औद्योगिक क्षेत्र बंद होते. व्यावसायिक आस्थापना बंद, रस्ते सफाई प्रक्रिया बंद होती. हॉटेल बेकरी येथून बाहेर पडणारा धूर या दिवशी बंद होता. रस्त्यावर जाळण्यात येणारा कचरा जाळला गेला नाही. याचा परिणाम म्हणून हवेतील धूलिकणांचे प्रमाण हे मानांकनापेक्षा निम्म्याहून कमी असल्याचे पाहणी निष्कर्षातून दिसून आले.

दाभोळकर कॉर्नर भागात हवेतील धूलिकणांचे प्रमाण ६६ टक्के असते, मात्र रविवारी दाभोळकर कॉर्नर परिसरातील हे प्रमाण १७.७० टक्के होते. अंबाबाई मंदिर परिसरात हवेतील धूलिकण कणांचे प्रमाण हे ५५ टक्क्यांपर्यंत जाते, हेच प्रमाण १०.५८ टक्क्यांवर आले होते. शिवाजी विद्यापीठ परिसरात प्रदूषित होण्याचे प्रमाण इतर वेळी ४१ टक्के असते, मात्र संचारबंदी काळात हवेतील धूलिकण केवळ ४.८४ टक्के असल्याची पाहणीत नोंद झाली आहे.